# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ११.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ११/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ०२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.११/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन २५.०२ लिटर दारू व एक मोसा असा एकुण २०,४८५/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अपघात:—**दिनांक ११/०९/२०२२ रोजी फिर्यादी प्रल्हाद शंकरराव सावळे वय २५ वर्ष व्य. मजुरी रा.वंजारवाडा हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१७.०८.२२ रोजी चे २०:३० वा चे सुमारास यव्हारे यांचे किराणा दुकान गांधी चौक व वंजारवाडा येथे आरोपीने त्यांचे ताब्यातील ट्रक क्र एम.एच.०४ ईबी १९७५ हा हयगीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मो.सा.ला पाठीमागुन जोराची धडक दिल्याने फिर्यादी हा रोडच्या कडेला पडला त्यानंतर आरोपी हा ट्रक घेवुन पळुन जात असतांना ट्रकचे पाठीमागील टायर फिर्यादीचे उजव्या हाताचे मनगटा वरून गेल्याने फ्रॅक्चर झाले व गंभीर दुखापत होवुन हात कापुन टाकण्यास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल :—**दिनांक ११/०९/२०२२ रोजी फिर्यादी विठ्ठल यादव गायकवाड रा.भंडारी ता.सेनगाव जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे सेनगाव येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ),४२७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०८.०९.२२ रोजी चे १९:३० वा चे सुमारास `लदरी ते सेनगाव जाणारे मेन रोडवर लिंबाळा तांडयाचे शिवारात निर्सग धाब्याजवळ ट्रक्टर क्र एम.एच.३८ व्हि.०२७८ च्या चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक्टर भरधाव वेगात व निष्काळजीपणे रोडचा अंदाज न घेता चालवुन पिकअप क्र एम.एच.२० ई एल ४०२७ ला जोराची धडक दिल्याने फिर्यादीचे डोक्याला पायस मार लागुन व गाडी मालक प्रकाश दळवी यास छातीत मारून लागला तसेच उध्दव राठोड यांचे डोक्याला मार लागुन मरण पावल आहे व पिकअपचे अंदाजे ३५००० रू चे नुकसान केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात सेनगाव पोलीस तपास करित आहेत.